# BDC LIBRARY

## New Paper Clipping

*A.Y. 2024-2025*

# बाळासाहेब देसाई महाविद्यालयास उत्कृष्ट एनएसएस युनिट पारितोषिक



बाळासाहेब देसाई महाविद्यालयाचा गौरव करताना मान्यवर.

पाटण, दि. १२ : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, राष्ट्रीय सेवा योजना २०२२-२३ साठीचे उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना युनिट म्हणून बाळासाहेब देसाई महाविद्यालयास जिल्हास्तरीय पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, रजिस्ट्रार डॉ. व्ही. एन. शिंदे, एन. एस. एस. विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले उपस्थित होते.

बाळासाहेब देसाई महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजनाच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबवून युवकांच्या मनामध्ये श्रमसंस्कार रुजवत संस्कारशील नागरिक बनविण्याचा प्रयत्न करून शिवाजी विद्यापीठात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून अनेक उपक्रम घेतले आहेत. त्याम ध्ये अगदी वृक्षारोपणापासून रक्तदान शिबिर ते वनराई बंधारेपर्यंत अनेक सामाजिक उपक्रम घेऊन शिवाजी विद्यापीठाच्या विविध योजना लोकांपर्यंत पोहोचवल्या आहेत. या उपक्रमांची दखल घेऊन शिवाजी विद्यापीठाकडून सन २०२२- २३ चा उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून डॉ. पट्टेबहादूर यांना व उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना युनिट म्हणून बाळासाहेब देसाई महाविद्यालयास जिल्हास्तरीय पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी कार्यक्रम अधिकारी डॉ. भरत जाधव, प्रा. लक्ष्मण गणगे, प्रा.विशाल कांबळे, प्रा. श्रीगणेश गायकवाड हे उपस्थित होते.

महाविद्यालयास उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना युनिट म्हणून पारितोषिक मिळाल्याबद्दल माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री विक्रमसिंह पाटणकर, सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर, कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, उपाध्यक्ष प्रकाशभाऊ पाटील, जनरल सेक्रेटरी श्रीमंत अमरसिंह पाटणकर, संचालक संजीव चव्हाण, याज्ञसेन पाटणकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, अधीक्षक विजय काटे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवकवर्ग यांनी अभिनंदन केले.